


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ००८ वा सोमवार दि. ०३ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बुलढाणा जिल्ह्यातही तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन,पण कारवाई शून्य...

## मंडळ अधिकारी टेकाळेंच्या भ्रष्टाचारी पापांमधील एक सोनेरी पान...

**बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळेंनी नियमात न बसणारी धनदांडग्याशी संगनमत करून मुख्य ठिकाणी असलेल्या करोडो रुपयांची सोन्या सारख्या जमिनी परिवारातील सदस्यांना भागीदारी केलेल्या शेकडो सातबारे शासन जमा व टेकाळेची विभागीय चौकशी सुरू असतांना नियमधाब्यावर ठेवून त्यातील शेकडो प्लॉट दुसऱ्याच्या नावावर केले तरी ही टेकाळेंवर कारवाई न करता महसूल विभाग कुंभकर्णी झोपेत?**




**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती संभाजी नगरमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या एका चौकशी अहवालात तुकडेबंदीचे उल्लंघन करीत तब्बल ७८८ रजीस्ट्री बेकायदेशीर असल्याचे उघड झाले आहे. असे अनेक प्रकार बुलढाणा महसूल विभागातही झालेले आहेत. कमीत कमी छत्रपती संभाजी नगर येथे हे प्रकार उघड झाले, त्याची चौकशी झाली आणि पुढे कारवाई देखील होईल. परंतु बुलढाणा महसूल विभागात भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. कारण येथे टेकाळेंसारखे गेंड्याच्या कातडीचे अधिकारी आहेत, तर त्यांच्यासमोर हतबल असलेले दूसरे वरिष्ठ अधिकारी आहेत. त्यामुळे येथे भ्रष्टाचार सुखेनैव सुरूच राहणार, असे चित्र सध्या तरी दिसून येत आहे.

महसूल विभागातील तुकडेबंदी कायदा हा जमिनीचे लहान तुकड्यांमध्ये विभाजन रोखण्यासाठी आहे. या कायद्यानुसार, प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. या कायद्याचा उद्देश शेतजमिनीचे समुचित वापर आणि संरक्षण करणे हा आहे. तुकडेबंदी कायद्यात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. महाराष्ट्र सरकारच्या १२ जुलै २०२१ च्या परिपत्रकानुसार, १,२,३ अशी गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्याला निर्बंध आले होते. शासनाच्या परिपत्रकानुसार तुकडेबंदी कायद्यात काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. परंतु टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराच्या किडीने या तुकडेबंदी कायद्यातही मोठ्या प्रमाणावर घाण पसरवली आहे. कारण टेकाळेंसारख्या महाभ्रष्टाचाऱ्यांना भ्रष्टाचार करताना कुठलीही लाज-शरम वाटत नसते. बेदरकारपणे आणि बेशरमपणे कुठेही भ्रष्टाचार करायचा आणि हावरटासारखे पैसे खायचे, हा टेकाळेंचा शिरस्ता असतो. कुणी निंदा, कुणी वंदा - फक्त भ्रष्टाचार हा टेकाळेंसारख्यांचा धंदा, अशी स्थिती महसूल विभागात आहे. त्यामुळे तुकडेबंदी कायद्याची पायमल्ली करून टेकाळे यांनी प्रचंड भ्रष्टाचार केलेला आहे.छत्रपती संभाजीनगर येथे रजीस्ट्रींमध्ये गैरप्रकार असल्याच्या पुराव्यांनिशी तक्रारी आल्या होत्या. यावर अनेक दिवस चौकशी होऊन आणि हजारो दस्त तपासून मग जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्याने सुधारित अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला. त्यामध्ये ७८८ रजीस्ट्रींची नोंद बेकायदेशीर असल्याचे तसेच तुकडेबंदी कायद्याचे उघडपणे उल्लंघन झाल्याचे म्हटले आहे. आता या प्रकरणात पुढे काय कारवाई होते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. परंतु अशीच चौकशी बुलढाणा महसूल विभागातही करणे गरजेचे आहे. ही चौकशी झाल्यास टेकाळेंसारखे आणि किती भ्रष्टाचारी किडे महसूल विभागात वळवळत आहेत हे उघड होणार आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या दोन वर्षांपेक्षा अधिक काळापासून महसूल विभागातील भ्रष्टाचारावर प्रहार करण्याचे काम करीत आहे. परंतु महसूल विभागातील अत्यंत ढिम्म आणि ढिसाळ अधिकारी यासंदर्भात काहीही चौकशी करण्यास तयार नाही. महसूल विभागातील प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याला टेकाळेंनी भ्रष्टाचाराची किती घाण महसूल विभागात पसरवली आहे, याची इत्थंभूत माहिती आहे. परंतु तरीही अधिकारी कुठल्या तरी दबावाखाली टेकाळेंच्या भ्रष्टाचाराकडे जाणुनबुजून डोळेझाक करीत आहेत. अधिकारी या माध्यमातून एक प्रकारे भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे काम करीत आहेत. एक तर अधिकारी दबावात असल्याने कारवाई करीत नाहीएत किंवा अधिकाऱ्यांचे टेकाळेंनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या गटारात मनसोक्त लोळण घेण्याचे काम करीत आहेत, हे दिसून येते. परंतु अधिकारी कितीही बेशरमपणे करोत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज बुलंद करीतच राहणार आहे, याची सर्वांनी आपल्या पदरी खुणगाठ बांधून घ्यावी. कारण भ्रष्टाचारासंदर्भात झिरो टॉलरन्स नीती दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजची आहे.

अजून बरेच काही पुढील भागात

# लोणार शहरावर तिसऱ्या डोळ्याची नजरेची आवश्यकता

## सीसीटीव्ही अभावी चोरटे मोकाट....

**जनसंचलन/ लोणार**

शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नितांत आवश्यकता असल्याचे काही महिन्यात घडलेल्या घटनांवरून स्पष्ट होत आहे. अनेक मोठमोठ्या घटना घडल्यानंतर सीसीटीव्ही कॅमेराचा अभाव असल्याने सुगावे लागत नसल्याची माहिती समोर येत आहे. लोणार हे जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ आहे. परंतु हे अनेक मुलभूत सोयी सुविधा पासून कोसो दूर असल्याचे चित्र आहे. लोणार शहरात देश-विदेशातून पर्यटक येत असतात. मात्र या ठिकाणी त्यांच्या सुरक्षेचा दृष्टीने कोणतीही उपाययोजना पहावयास मिळत नाही. लोणार शहरात वाढत्या चोऱ्या, वाढते पशुधन चोरी, अपघात, मनुष्य हरवल्याच्या अनेक तक्रारी पोलिस स्टेशनला प्राप्त होत आहेत. परंतु लोणार शहरात असलेला सीसीटीव्ही कॅमेराचा अभावामुळे हया अनेक गुन्ह्यांना उघडकीस आणण्यात दिरंगाई होत असून तपासात अपयश येत असल्याचे निर्दर्शनास येत आहे. त्यामुळे लोणार शहराचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून जनमाणसात झ्ढ्ढअसंतोषफ्फ निर्माण होत असल्याचे चित्र आहे. लोणार शहरात अनेक शाळकरी मुली हया लोणार ला बाहेर गावावरून शिकण्यासाठी येत असतात. त्यांना सुद्धा चीडीमारीचा सामना करावा लागतो. अशा घटनांवर अंकुश लागत नसल्याने अनेक मुली हया पुढील शिक्षण बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच लहान मुल शाळेतून येत असतांना दुचाकीस्वार हे तुला घ्यायला तुझ्या घरच्यांनी आम्हाला पाठवल आहे असे सांगून अपहरण करण्याच्या बेतात असल्याच्या घटना





घडत असल्याची माहिती समोर येत आहे. तरी या सर्व घटनेंचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक प्रशासनाने पर्यटक, विद्यार्थीनी, लहान शाळकरी मुल-मुली यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे अशी मागणी होत आहे. या मागणीची दखल घेत केंद्रीय आरोग्य मंत्री प्रतापराव जाधव तथा मेहकर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात व -माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर याबाबत काय पाठपुरावा करतात याकडे लोणार वासियांचे लक्ष लागले आहे .

# ...पक्षी आणि पाणथळ जमीन...

## संपादकीय लेख

जागतिक पाणथळ जमीन दिवस हा एक पर्यावरणाशी संबंधित उत्सव आहे, जो १९७१चा आहे, जेव्हा अनेक पर्यावरणवादी पाणथळ प्रदेशांच्या संरक्षण आणि प्रेमाची पुष्टी करण्यासाठी एकत्र आले होते, ज्या जल परिसंस्था आहेत ज्यात वनस्पती जीवन आणि इतर जीव आहेत जे केवळ पाणीच नाही तर पर्यावरणीय आरोग्यास भरपूर प्रमाणात आणतात. शरीर पण संपूर्ण वातावरण, जागतिक पाणथळ प्रदेश सचिव विभाग मूळचा ग्लँड, स्वित्झर्लंडचा आहे. कॅस्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरील इराणी शहर रामसर येथे रामसर अधिवेशनाचा अवलंब दि.२ फेब्रुवारी १९७१ रोजी झाला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा हा मार्गदर्शक संकलित लेख जरूर वाचाच.

इराणमधील कॅस्पियन या समुद्राच्या किनाऱ्यावरील रामसर या शहरी पाणथळ प्रदेशाचे महत्त्व या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. पाणथळ प्रदेशांना मानवी जीवनात असलेले स्थान सर्वांना समजावे या हेतूने दर वर्षी २ फेब्रुवारीचा दिवस वेटलँड्स डे साजरा केला जावा, असा निर्णय या परिषदेत घेतला गेला. असा पहिला दिवस १९९७ साली साजरा झाला होता. पाणथळ प्रदेश म्हणजे नदी, तलाव, सागरी किनारे अशा ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व अनेकविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडपांनी भरलेल्या पाणथळ जमिनी आपल्याला आढळतात. त्यामध्ये कृत्रिम तलाव व कालवे, मिठागरे, सांडपाण्याचे तलाव, मत्स्यशेती तलाव, शेततळी, भाताची खाचरे अशा मानवनिर्मित स्थळांचाही समावेश होतो.असा बहु उपयोगी पाणथळ प्रदेशात सद्या आपण भूगर्भातील पाण्याचा भरपूर वापर करतो. या पाण्याचे पुनर्भरण करण्याचे काम असे प्रदेश करतात. अनेकदा आपण प्रदूषित पाणी व इतर हानिकारक द्रव्ये अशा प्रदेशात फेकतो खरे; परंतु पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पतीच या घटकांना गाळण्याचे काम करून पाणी शुद्ध करतात. उदा.कोलकात्यातून बाहेर टाकल्या जाणाऱ्या घाण पाण्याचा काही भाग शुद्ध करण्यासाठी जवळच्या पाणथळ प्रदेशाचा वापर केला जातो. भातखाचरे आणि मत्सबीज उत्पादनासाठी बनवलेली तळी हे देखील पाणथळ प्रदेशच असल्याने त्यांमधून जगभरातील ३ अब्ज लोकांना दररोजचे अन्न- भात आणि मासे मिळते. सागरी किनारपट्टीवर असलेल्या अशा गवतयुक्त पाणथळ प्रदेशांमुळे लाटांनी होणारी किनाऱ्यांची धूप थांबवली जाऊन वादळांपासून होणारे नुकसानही घटते. शिवाय समुद्राचे आक्रमण थोपवून किनारी जमीन अतिक्षारयुक्त- निरुपयोगी खारपड होण्याची क्रियाही तेथील मॅनग्रुव- खारफुटी प्रकारच्या झुडपांमुळे कमी होते. नदीला पूर आल्यास किंवा अतिवृष्टी झाल्यासही हे जास्तीचे पाणी किनारी पाणथळ प्रदेशात मुरते व मानवी वस्ती जलमय होण्याच्या संभाव्य धोक्याचे प्रमाण कमी होते. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसते, की इथले महत्त्वाचे पाणथळ प्रदेश हे दख्खनच्या पठारावरील नद्या-उपनद्या, धरणांमागील जलाशय आणि पाझर तलावांच्या आसपासच्या परिसंस्था आहेत. यामुळे भूजलाचे पुनर्भरण आणि पाझर यात मोलाची मदत होते. पक्षी आणि पाणथळ प्रदेशात बगळे, बदके, करकोचे, खंड्या तसेच शिकारी प्रजातींच्या व इतरही अनेक पक्ष्यांना पाणथळ प्रदेशांतूनच अधिवास मिळतो. प्लवर सारख्या विशिष्ट प्रजातींची घरटी पाणथळ प्रदेशांत आढळतात. करकोचे, शराटी- इबिस, चमचा, रोहित- फ्लेमिंगो हे पक्षीही पाणथळ जागीच येतात. अगदी सायबेरियासारख्या प्रदेशांतूनही क्रेन आणि बदके इथे येतात. कारण इथे त्यांना अन्न मिळते. हे पक्षी या प्रदेशातील अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा दुवा असतात. आपण काय करू शकतो. दुर्दैवाने आज पाणथळ प्रदेशांकडे वाया गेलेली जमीन म्हणूनच पाहिले जाते, पण जैविक आणि पर्यावरणीय साखळीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन ते जतन करून, तिथला कचरा इ.दूर करून त्यांचा सजगतेने वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वैयक्तिक पातळीवर सुद्धा पाणथळ प्रदेश वाचविण्याचा प्रयत्न केला तरी या दिशेने एक ठोस पाऊल उचलले जाऊ शकते. आपल्या प्रत्येकाच्या खारीच्या वाट्याने पृथ्वीवरची ही महत्त्वाची समस्या काही प्रमाणात कमी होऊ शकते आणि पर्यावरणाची बूज राखली जाऊ शकते.

जागतिक पाणथळ भूमी दिवस दरवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो, जरी तो १९९७पर्यंत साजरा केला जात नव्हता. हा दिवस जगभरातील पाणथळ प्रदेशांचा प्रभाव आणि सकारात्मक उत्पादन अधोरेखित करतो आणि समुदायांना फायद्यासाठी एकत्र आणतो.



हा दिवस केवळ लोकांसाठीच नाही तर ग्रहासाठी पाणथळ भूभागाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल जागतिक जागरूकता वाढवतो. समुदाय रक्षक आणि पर्यावरणप्रेमी सर्वजण या दिवशी एकत्र येऊन निसर्गावरील त्यांचे प्रेम उत्सवाच्या माध्यमातून साजरे करतात, जे केवळ मानवांसाठीच नव्हे, तर जगातील सर्व प्रकारच्या जीवांसाठी पाणथळ प्रदेशांनी काय केले हे ओळखते. कालांतराने मानवी बांधकामामुळे पाणथळ प्रदेशांवर परिणाम करणाऱ्या विविध पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. जास्त लोकसंख्या आणि बांधकामामुळे पर्यावरण संवर्धन कमी झाले आहे. अनेक पाणथळ जागा गमावल्या जात आहेत आणि पर्यावरण शास्त्रज्ञांचा असा दावा आहे की जगाचा नैसर्गिक फिल्टर आणि संरक्षक हरवण्याआधी मानवाने कोंडी ओळखली पाहिजे.

सन १९९८पासून रामसर सचिवालयाने आर्थिक सहाय्यासाठी डॅनोन ग्रुप इव्हियन फंड फॉर वॉटर-पॅरिसच्या बाहेरील आणि बार्सिलोना, स्पेनमध्ये स्थापित सह भागीदारी केली आहे. रामसर सचिवालयासाठी ज्याला रामसर कन्व्हेन्शन ऑन वेटलँड्स ऑफ इंटरनॅशनल इम्पॉर्टन्स म्हणूनही ओळखले जाते, विशेषत: वॉटरफॉल हॅबिटॅट म्हणून या आर्थिक सहाय्यान डब्ल्यूडब्ल्यूडी साजरा करण्यासाठी आयोजित केलेल्या देशांच्या उपक्रमांना समर्थन देण्यासाठी लोगो, पोस्टर्स, फॅक्टशीट्स, हँडआउट्स आणि मार्गदर्शक दस्तऐवजांसह विविध पोहोच सामग्री तयार केली आहे. हे साहित्य जागतिक पाणथळ दिवस वेबसाइटवर अधिवेशनाच्या तीन भाषांमध्ये विनामूल्य डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे, इंग्रजी, फ्रेंच आणि स्पॅनिश भाषेत. असे म्हटल्याबरोबर सर्व साहित्य इव्हेंट आयोजकांसाठी त्यांच्या स्थानिक भाषा आणि संदर्भांमध्ये सानुकूलित करण्यासाठी आणि त्यांना अनुकूल करण्यासाठी त्यांच्या डिझाइन फाइल्समध्ये देखील उपलब्ध आहेत. सन सचिवालयाला विनंती केल्यावर काही मुद्रित प्रती देशांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

# संदीप मापारी पाटील यांची लोणार तालुका अध्यक्षपदी वर्णी!

जनसंचलन/ बुलढाणा



प्रत्येकांसाठी झटण्यासाठी आपले पाऊल पुढे ठेवणारी अर्थात पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेशी संलग्रित डिजिटल मीडिया परिषदेची बुलढाणा जिल्हा कार्यकारणी गठीत करण्यात आली आहे.या कार्यकारणीत बुलढाणा तालुकाध्यक्षपदी संदीप मापारी पाटील यांची निवड झाली आहे. डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनात तथा डिजिटल मीडिया परिषदेचे विभागीय सचिव जितुभाऊ कायस्थ यांच्या नेतृत्वाखाली मीडिया परिषदेने उर्वरित कार्यकारणी घोषित केली. यामध्ये, जिल्हा उपाध्यक्षपदी मेहकर येथील बाळू वानखेडे तर संघटक म्हणून चिखलीचे इस्तेखार खान यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.समाजाचा आरसा ठरलेल्या पत्रकारांचे जगणे स्थिर करण्यासाठी, इतकेच नाही तर त्यांच्या समस्येवर निराकरण करीत जगण्याची नवीन उमेद देण्यासाठी मराठी पत्रकार परिषद अविरतपणे काम करीत आहे. राज्यात मराठी पत्रकार परिषदेचा विस्तार सर्व दूर होत असून, बुलढाणा जिल्ह्यातही संघटनेचा विस्तार जोमाने सुरू आहे. जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीत सिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाने तसेच डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल मीडियाची जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये, झी २४ तास या वृत्तवाहिनीचे जिल्हा प्रतिनिधी मयूर निकम यांची जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तर सचिव पदी नवराष्ट्र न्यूज चॅनलचे दीपक मोरे, उपाध्यक्षपदी ओटीटी मराठीचे किशोर खंदारे, घाटाखालील जिल्हाध्यक्ष म्हणून श्रीधर ढगे यांची नेमणूक करण्यात आली. तदनंतर, डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हा कार्यकारिणीने उर्वरित कार्यकारणी घोषित केली. यामध्ये, उपाध्यक्ष म्हणून बाळू वानखेडे, जिल्हा संघटक पदी इफेतखार खान, प्रसिद्धीप्रमुख ॲड. संदीप मेहत्रे, जिल्हा कोषाध्यक्ष म्हणून महत्वाची धुरा गणेश सवडतकर यांच्याकडे सोपविण्यात आली. समन्वयक पदी योगेश शर्मा,बुलढाणा तालुका अध्यक्षपदी प्रशांत खंडारे तर चिखली तालुकाध्यक्षपदी छोटू कांबळे, लोणार तालुकाध्यक्षपदी संदीप मापारी, सिंदखेडराजा तालुकाध्यक्षपदी राहुल झोटे तसेच देऊळगाव राजा तालुक्याचे अध्यक्ष म्हणून अशोक जोशी यांची निवड करण्यात आली आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# बुद्ध चरित्र सामान्य माणसाला बुद्धत्वाकडे नेते : प्रियदर्शी थेरोजी





**बुलढाणा :** मनुष्य जन्माने शुद्र किंवा ब्राम्हण नसतो. तर कर्माने मनुष्य शुद्र व ब्राम्हण होतो. कठोर तप आणि साधनेमुळे उच्चतम अवस्था प्राप्त होते. बुद्ध चरित्र भगवंत कथेचे अमृतवर्षा सामान्य मनुष्याला बुद्धत्वाकडे नेते. असे प्रतिपादन पुज्य सदधर्माचार्य भिक्षु प्रियदर्शी थेरोजी यांनी बुद्धचरित्र कथेचे प्रथम पुष्प गुंफताना केले. सद्भावना सेवा समिती आणि सिंहनाथ सेवा संघ द्वारा सहकार विद्या मंदिर दि.३१ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी पर्यंत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रियदर्शी थेरोजी, भंते मेत्तानंदजी, राधेशामजी चांडक, डॉ.सुकेश झंवर, सौ. कोमल सुकेश झंवर, विजय वाकोडे, शिवाजीराव गवई यांनी सहकार विद्या मंदीर परिसरात असलेल्या गौतम बुद्धांच्या मुर्तीचे पुष्प देऊन वंदन केले. यश सिद्धी सैनिक संघाने शिस्तबद्ध रितीने संचलन करीत भिकुसंघाच्या हस्ते पंचशील ध्वजारोहन करण्यात आले. व मानवंदना देण्यात आली. ध्वजारोहनानंतर कथाचार्य प्रियदर्शी थेरोजी यांना पीठा कडे उपासक व उपासिका द्वारे सन्मानाने नेण्यात आले. या प्रसंगी राधेशामजी चांडक, डॉ.सुकेश झंवर,सौ कोमलताई झंवर,राजेश देशलहरा, चंपालाल शर्मा, तिलोकचंद चांडक, सिद्धार्थ शर्मा, विजय वाकोडे, शिवाजीराव गवई, विजय सावजी, प्रकाशचंद्र पाठक, उमेश मुंदडा, प्रशांत इंगळे, गजानन जाधव, शैलेश भंडारे, सोनाजी दाभाडे, अनंताभाऊ देशपांडे, सुहास गवई, पगारे, सरकटे,डोंगरदिवे आदी सर्व मान्यवर उपस्थित होते.

पीठावर भगवान बुद्धाच्या मुर्तीचे सर्वांनी पुष्प दान करुन दर्शन घेतले, उपासक व उपसिकांनी सामुहिक याचना केली. राधेशाम चांडक यांनी प्रियदर्शी थेरोजींना ग्रंथावर माल्यार्पण अर्पण करुन वंदन केले. भंते मेत्तानंद यांनी थेरोजीचा परिचय करुन दिला. थेरुजी यांची विद्वता व मधुर वाणीमुळे सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. अनेक कथा सुरस व रसाळ वर्णन करुन सांगीतल्या. सहकार विद्या मंदिर परिसरात असलेले भगवान बुद्धाची मुर्ती अठ्ठावीसावे बुद्ध असल्याचे सांगीतले. कथेचे पुष्प गुंफताना बुद्धाच्या जन्माची कथा, कठोर तप, बोधीकथा ऐकुण श्रोत्यांचे डोळे पानावले होते. बुद्धाइतके कठोर तप कोणीही केले नाही. तप करतांना बुद्धांचे शरीर पाण्यावर वाहुन जाणा-या झाडाच्या पानासारखे झाले होते. पुढे भंते म्हणाले की, बुद्धाचा जन्म व्हायचा असेल तर, आई-वडीलांनी कोणत्या गोष्टी पाळायच्या हे सविस्तर स्पष्ट केले. सत्य हे खोट्या व्यक्तीलाच कडु असते. सत्यवादी व्यक्तीला सत्य हे सुमधुर असते. अनेक सुत्राच्या आधारे थेरोजी यांनी बुद्धचरित्र अमृत वर्षा केली. सभागृहातील श्रोते आनंदाच्या लाटेवर पोहत होते, असे जाणवत होते. भंते मेत्तानंदजी यांनी सुत्रसंचालन केले. या कथेचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन समितीचे अध्यक्ष राधेश्यामजी चांडक आणि सिंहनाद सेवा संघाचे अध्यक्ष विजय वाकोडे यांनी केले. सहकार विद्या मंदिराच्या दोन बसेस व उपासकांचे ऑटो विनामुल्य श्रोतांना ने-आण करीत होते. उस्फुर्त सेवा ऑटोने दिले हे सुद्धा एक प्रकारचे धम्मदान असल्याचे भंतेजीनी सांगीतले

# बलाढ्य अमेरिकेला कॅनडाचं जशाचं तसं उत्तर, ट्रम्प यांचं पुढचं पाऊल काय?



**मुंबई :** नुकताच कॅनडातून येणाऱ्या सर्व वस्तूंवर २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा अमेरिकेने केली. आता अमेरिकेला सडेतोड उत्तर कॅनडाकडून देण्यात आल्याचे बघायला मिळतंय. अमेरिकेच्या घोषणेनंतर आता कॅनडाकडूनही कठोर पाऊले उचलण्यात आली आहेत. कॅनडाचे काळजीवाहू पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी मोठी घोषणा केली. कॅनडाने ४ फेब्रुवारी २०२५ पासून अमेरिकन आयातीवरील १५५ अब्ज डॉलर्सवर २५ टक्के शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतलाय. जस्टिन ट्रूडो यांनी इंस्टाग्रामवर पोस्ट केले आणि लिहिले की, त्यांचा देश अमेरिकन शुल्काचा सामना करण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. शनिवारी १ फेब्रुवारी, २०२५ रोजी ट्रम्प यांनी चीनमधून सर्व आयातीवर १० टक्के शुल्क लागू करण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. मेक्सिको आणि कॅनडामधून आयात केलेल्या वस्तूंवर २५ टक्के शुल्क लागू केले. यानंतर आता कॅनडानेही कठोर पाऊले उचलले आहेत. अमेरिकेच्या ३० अब्ज डॉलर्सच्या मालावर लगेचच आयातशुल्क लावण्यात आले. १२५ अब्ज डॉलर्सच्या मालावर २१ दिवसांनंतर कॅनडात २५ टक्के शुल्क आयाती शुल्क लागू होणार आहे. अमेरिका आणि कॅनडात आयात शुल्कावरून मोठा वाद निर्माण झाल्याचे बघायला मिळतंय. अमेरिकन सरकारच्या नव्या आदेशानुसार कॅनडातून तेल आणि विजेसह ऊर्जा आयातीवर जास्तीचे शुल्क आकारले जाईल. दुसरे देश अमेरिकेचा फायदा उचलतात. मात्र, त्यांच्याकडून अमेरिकेला फायदा होत नाही, असे ट्रम्प यांनी म्हटले होते.निवडणूक प्रचारातच आयात शुल्क वाढवण्याचा इशारा त्यांनी दिला होता. देशांतर्गत , बणनाऱ्या उत्पादनाची मागणी वाढेल, असेही त्यांनी म्हटले होते. जस्टिन ट्रूडो यांनी सांगितले की, मंत्रिमंडळाची त्यांनी भेट घेतली आहे आणि लवकरच मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम यांच्याशी या विषयावर ते चर्चा देखील करणार आहेत. काही दिवसांपूर्वीच भारताबद्दलच्या आयात शुक्लावरही भाष्य करताना ट्रम्प हे दिसले होते.

# अमित शहांनी आश्वासन दिलेलं, पण... शिंदेंना धक्का बसलाय; संजय राऊत यांचा खळबळजनक गौप्यस्फोट



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून महायुती सरकारमध्ये काही आलबेल नसल्याचं दिसत आहे. मंत्रिपदे वाटण्यापासून ते पालकमंत्री वाटपापर्यंत शिंदे नाराज असल्याचं अनेकदा समोर आलं होतं. अशातच संजय राऊत यांनी शिदे गटातील आमदारासोबत झालेल्या बोलण्याबाबत अग्रलेखात सर्वकाही सविस्तरपणे सांगितलं आहे. अमित शहा यांनी दिलेले आश्वासन पाळले नाही असं शिंदेना वाटत असल्याचं आमदाराने राऊतांशी बोलताना सांगितलं. शिंदे गटाचे एक त्यातल्या त्यात बरे आमदार विमान प्रवासात भेटले. त्यांनी त्याही पुढची माहिती देऊन गोंधळ वाढवला. शिंदे हे स्वत:ला अपमानित केल्याच्या दु:खातून बाहेर पडायला तयार नाहीत. अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात शिंदे व फडणवीस यांची तोंडे दोन दिशांना होती. आता फडणवीस त्याचे उट्टे काढत आहेत. कारण शिंदे यांच्या हातात काहीच राहिलेले नाही.फ्ननिवडणुका तुमच्याच नेतृत्वाखाली लढवू व २०२४ नंतरही पुन्हा तुम्हीच मुख्यमंत्री असाल, चिंता करू नका. निवडणुकीत सढळ हस्ते खर्च करा, असे आश्वासन अमित शहा यांनी शिंदे यांना दिले होते. शिंदे यांनी प्रचंड पैसा निवडणुकीत टाकला, पण शहा यांनी दिलेले आश्वासन पाळले नाही व आपली फसवणूक झाली असे शिंदे यांना वाटतेफ्फ- आमदार या आमदाराने पुढे माहिती दिली ती महत्वाची. शिंदे व त्यांच्या लोकांचे फोन टाप केले जात आहेत असे शिंदे यांना खात्रीने वाटते व दिल्लीच्या एजन्सी आपल्या हालचालींवर पाळत ठेवून असल्याचा शिंदे यांना संशय आहे, पण शिंदे यांची पुरती कोंडी आता झाली आहे. दरम्यान, संजय राऊतांना विमानामध्ये भेटलेला आमदार कोण? खरंच शिंदे आणि फडणवीसांमध्ये जुगलबंदी सुरू आहे का? असे अनेक सवाल आता उपस्थित झाले आहेत. यावर एकनाथ शिंदे काय बोलतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# पुण्यात ठाकरे गटाला बसणार मोठा धक्का? जुना शिलेदार सोडणार साथ? नेमका कोण?



**पुणे :** आगामी महापालिका निवडणुकीआधी सगळे पक्ष तयारीला लागले आहे. निवडणुकांच्या तारखा कधीही जाहीर होऊ शकतात. यादरम्यान शिंदेंच्या शिवसेनेचे ऑपरेशन टायगर चर्चेत आहे. ठाकरे गटाच खासदार आपल्याकडे घेण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यासोबतच स्थानिक नेत्यांनाही आपल्याकडे घेण्याचा शिंदे गटाचा कल दिसत आहे. अशातच पुणे शहरात ठाकरेंना जुने शिलेदार सोडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. कोण आहेत तो नेता? ठाकरेंना जय महाराष्ट्र करण्याच्या तयारीत दिसत आहे. पुण्यातील शिवसेनेचे माजी आमदार चंद्रकांत मोकाटे यांच्या शिंदे गटात जाण्याची चर्चा सुरू आहे. कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राहिलेल्या चंद्रकांत मोकाटे यांनी शिवसेनेचे मंत्री उदय सामंत याची भेट घेतली आहे. मोकोटे यांच्या जाण्याने ठाकरे गटासाठी सेटबॅक ठरणार आहे. या भेटीनंतर मोकाटे यांनी आपण वैयक्तिक कारणासाठी भेटल्याचं सांगितलं आहे. मात्र तरीसुद्धा त्यांनी पण ठाकरे गटामध्ये नाराज असल्याचं जाहीरपणे म्हटलं आहे. विधानसभा निवडणूक लढवली त्यावेळी पक्षातील इच्छुकाने काम केलं नाही, त्याच व्यक्तीला माझ्य शेजारी बसवण्यात आलं होतं. यासंदर्भात वरिष्ठांकडे नाराजी सांगितली असून त्यांनी चूक झाल्याचं कबूल केली, असं चंद्रकांत मोकाटे यांनी सांगितलं. पुण्यात शिवसेना ठाकरे गटाची सचिन अहिर, माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, नेत्या सुषमा अंधारे, माजी नगरसेवक पृथ्वीराज सुतार, माजी नगरसेवक वसंत मोरे आणि पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली होती. या बैठकीमधून चंद्रकांत मोकाटे तडकाफडकी बाहेर पडले होते. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे बैठकीला आल्यावर त्यांना खुर्ची देत मोकाटे निघून गेले होते. त्यामुळे अंधारे येताच मोकाटे हे बाहेर गेल्याने ते नेमके कोणामुळे बाहेर गेले हा संभ्रम झाला. विधानसभेला शिवसेनेकडून इच्छुक असणारी व्यक्ती म्हणजे पृथ्वीराज सुतार आहेत. सुतार हे माजी नगरसेवक राहिले आहेत. विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये शिवसेनेचे माजी आमदार आणि ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत मोकाटे यांनी चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात कोथरूड विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवली होती.

## वीर पहाडियाचा स्काय फोर्स १०० कोटी क्लबमध्ये करणार एन्ट्री! शाहिदच्या देवाकडून तगडी टक्कर

**मुंबई:** शाहिद कपूरच्या देवा चित्रपटाने प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर धमाका केला आहे. पहिल्याच दिवशी या चित्रपटाने चांगली कमाई केली आणि २०२५ या वर्षात सर्वात मोठी ओपनिंग करणारा तो दुसरा चित्रपट ठरला आहे. या सिनेमाने दुसऱ्या दिवशी पहिल्या दिवसापेक्षा जास्त कमाई केली. दुसरीकडे अक्षय कुमार आणि वीर पहाडिया यांच्या स्काय फोर्स या चित्रपटाची कमाई ८ व्या दिवशी घसरली होती, पण ९ व्या दिवशी या चित्रपटाच्या कमाईतही वाढ झाली. दोन्ही चित्रपट सध्या तरी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहेत. जाणून घ्या देवाने दुसऱ्या दिवशी आणि स्काय फोर्सने नवव्या दिवशी बॉक्स ऑफिसवर किती कमाई केली... देवा हा चित्रपट रोशन अँड्युज ज यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट असून शाहिद आणि पूजा हेगडे महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. सुमारे ८५ कोटींच्या बजेटमध्ये बनवलेल्या या चित्रपटाने देशभरात पहिल्या दिवशी ५.५० कोटींची कमाई केली आणि आता दुसऱ्या दिवशी ६.२५ कोटींची कमाई केली आहे. अशाप्रकारे दोन दिवसांत चित्रपटाची कमाई ११.७५ कोटी रुपये झाली आहे.

सध्या या चित्रपटासमोर स्काय फोर्स वगळता दुसरा कोणताही मोठा चित्रपट नाही, त्यामुळे या चित्रपटाला कमाईची मोठी संधी आहे. शाहिदच्या या सिनेमाच्या जगभरातील कलेक्शनबद्दल बोलायचे झाले तर, देवाने पहिल्या दिवशी ७.५० कोटी रुपयांची कमाई केली होती, परंतु दुसऱ्या दिवसाचे कलेक्शन अद्याप समोर आलेले नाही.अक्षय कुमार आणि वीर पहाडिया यांचा स्काय फोर्स बॉक्स ऑफिसवर येऊन ९ दिवस झाले आहेत, आता मात्र या चित्रपटाचा वेग मंदावला आहे. १२.२५ कोटी रुपयांच्या दमदार ओपनिंगनंतर, स्काय फोर्सची कमाई चौथ्या दिवसापासून सतत कमी होत होती. तिसऱ्या दिवशी २८ कोटींची मोठी कमाई केल्यानंतर, या सिनेमाचे कलेक्शन घसरले. आठव्या दिवशी तर अवघे ३ कोटी कमावता आले, मात्र त्यानंतर ९ व्या दिवशी चित्रपटाने पुन्हा एकदा उडी घेतली असून ५ कोटींची कमाई केली. एकूण ९ दिवसात या चित्रपटाची कमाई ९४.५० कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

## हे पान म्हणजे पूर्ण मेडिकल स्टोअर! वाळवून तयार करा पावडर, २०६ हाडं होतील पोलादापेक्षा टणक





प्राचीन काळापासून भारतात औषधी वनस्पती आणि वनस्पतींचा वापर रोगांवर उपचार करण्यासाठी केला जातो. औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेली फुले, पाने आणि फळे आयुर्वेद औषधात वापरली जातात. अनेक नैसर्गिक गोष्टींमध्ये शक्तिशाली पोषक घटक असतात, जे औषधासारखे कार्य करतात. कधीतरी तुम्ही शेवग्याच्या झाडाबद्दल ऐकले असेलच. या झाडाची पाने आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानली जातात. त्याला ड्रमस्टिक असेही म्हणतात. मोरिंगाच्या पानांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट्स आणि प्रथिने असतात, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारते. शरीरासाठी फायदेशीर अनेक पोषक तत्वांनी युक्त ड्रमस्टिक आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ड्रमस्टिक पावडरच्या सेवनाने शरीरातील अनेक रोग आणि समस्या कमी होण्यास मदत होते. पाने वाळवून ड्रमस्टिक पावडर तयार केली जाते. ड्रमस्टिकच्या पानांसह, त्याची फळे आणि देठ देखील वापरतात. कर्बोदके, प्रथिने, कॅल्शियम, लोह, पोटॅशियम, जीवनसत्त्वे आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात ड्रमस्टिक पावडरमध्ये आढळतात. ड्रमस्टिक पावडरचे सेवन हृदय, फुफ्फुस आणि किडनीसाठी खूप फायदेशीर मानले जाते आणि आयुर्वेदात औषध म्हणून वापरले जाते.जेव्हा आपण काही खातो तेव्हा त्यातील अनेक पदार्थांमध्ये आर्सेनिक विष असते. यकृत आणि किडनी हे विष गाळून टाकतात, परंतु हे विष दीर्घकाळ चालू राहिल्यास यकृत आणि किडनी खराब होण्याची भीती असते. मोरिंगामध्ये हे विष निष्प्रभ करण्याची क्षमता आहे. शेवग्याच्यामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असल्यामुळे ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी योग्य आहे. रोगप्रतिकारशक्ती वाढवल्याने संसर्गाचा धोका कमी होतो.आधुनिक जीवनशैलीमुळे बहुतेक लोकांच्या रक्तात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जास्त असते. खराब कोलेस्टेरॉल हृदयाच्या धमन्यांना चिकटू लागते ज्यामुळे हृदयाकडे जाणारा रक्तप्रवाह कमी होतो. यामुळे हृदयविकाराचा झटका आणि हृदय अपयशाचा धोका वाढतो. मोरिंगा खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते.मोरिंगामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. संधिवात वेदना जळजळ झाल्यामुळे उद्भवते. हृदयात जळजळ झाल्यास, त्यामुळे हृदयाचे स्नायू कमकुवत होतात. अशाप्रकारे, ड्रमस्टिक दाहक-विरोधी बनते आणि सांध्यातील सूज कमी करते आणि वेदना कमी करते.महिलांवर केलेल्या एका अभ्यासात असे आढळून आले की जेव्हा तीन महिन्यांपर्यंत दररोज सुमारे ७ ग्रॅम ड्रमस्टिकच्या पानांची पावडर दिली जाते तेव्हा त्यांच्या रक्तातील अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण लक्षणीय वाढले. याशिवाय साखरेचे प्रमाणही खूप कमी झाले आहे. यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ऍसिड खाल्ल्यानंतर रक्तातील साखरेची वाढ मोठ्या प्रमाणात कमी करते.मोरिंगामध्ये २ ग्रॅम प्रथिने, अनेक प्रकारचे जीवनसत्त्वे, लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, फोलेट, कॅल्शियमसह अनेक प्रकारची संयुगे असतात. यासोबतच त्यात केरॅटिन आणि क्लोरोजेनिक ॲसिड नावाचे शक्तिशाली अँटीऑक्सिडंट आढळतात जे शरीराच्या प्रत्येक कोपऱ्यातून मुक्त रॅडिकल्स काढून टाकतात. मुक्त रॅडिकल्स कमी केल्याने अनेक जुनाट आजार आणि संधिवात सारख्या वेदनांपासून आराम मिळू शकतो.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रोहित आणि विराटबाबत गौतम गंभीर अखेर खरं ते बोलून गेले, म्हणाले या दोघांनी संघातील जागा...





**नवी दिल्ली :** रोहित शर्मा आणि विराट कोहली हे सध्या निवृत्तीच्या वाटेवर असल्याचे म्हटले जात आहे. कारण हे दोघेही धावांचा दुष्काळ अनभवत आहेत. त्यामुळे भारतीय संघात ते किती दिवस राहतील, हे लवकरच कळेल. रोहित आणि विराट यांच्याबाबत आता भारताचे प्रशिक्षक यांनी खरं ते सांगितलं आहे. गंभीर यांच्या या वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा सुरु झाली आहे. रोहित आणि गंभीर हे दोघे रणजी ट्रॉफीतही धावा करण्यात अपयशी ठरले आहेत. जे रणजी स्पर्धेत धावा करू शकत नाहीत, ते आंतरराष्ट्रीय स्तरावर कशी चांगली कामगिरी करू शकतात, असा प्रश्न आता चाहते विचारू लागले आहेत. त्यामुळे रोहित आणि विराट हे जास्त काळ भारतीय संघात राहणार नसल्याची, जोरदार चर्चा सुरु झाली आहे. कदाचित चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर रोहित आणि विराट भारतीय संघात जागा मिळवून शकणार नाहीत, असेही म्हटले जात आहे. पण गंभीर यांच्या वक्तव्याने आता या दोघांच्या भवितव्याबाबतची दिशी ठरल्याचे दिसत आहे. गौतम गंभीर यांनी रोहित आणि विराटबाबत म्हटले आहे की, ङ्ग माझ्यासाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी भारतीय ड्रेसिंग रुमला बऱ्याच गोष्टी शिकवल्या आहेत. रोहित आणि विराट यांनी भारतीय संघातील आपले स्थान उगाचच निश्चित केलेले नाही तर त्यांचे टीम इंडियाला बऱ्याच गोष्टी दिल्या आहेत. भारतीय खेळाडू जसे सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी आसूसलेले असतात, तसेच रोहित आणि विराट या दोघांमध्येही धावांची भूक असल्याचे पाहायला मिळाले आहे. ङ्ग रोहित आणि विराट यांच्यासाठी हा कठीण काळ समजला जात आहे. त्यामध्येच गौतम गंभीर यांनी आता रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याबाबत आता एक मोठे वक्तव्य केले आहे. गंभीर यांच्या वक्तव्यानुसार आता रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा अनुभव भारतीय संघासाठी महत्त्वाचा असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना लवकर संघाबाहेर करणार नसल्याचे गंभीर यांना सांगायचे आहे, याची चर्चा सुरु झाली आहे.रोहित आणि विराट यांच्या भवितव्याबाबत आता गंभीर यांनी एक मोठे वक्तव्य केले आहे.

# राज्यातील प्रकल्पांना निधीचे बळ :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** केंद्रीय अर्थसंकल्पात मुंबई मेट्रोसाठी १,२५५.०६ कोटी रुपये, तर एमयूटीपीसाठी ५११.४८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्था आणखी गतिमान होईलफ, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.केंद्रीय अर्थसंकल्पातून देशाचा कायापालट होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त करीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थसंकल्पात मुंबईसह महाराष्ट्रासाठी करण्यात आलेल्या भरीव तरतुदीकडे लक्ष वेधले. ङ्गमुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधेसाठी ७९२.३५ कोटी रुपये, मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी ४००४.३१ कोटी, पुणे मेट्रोसाठी ६९९.१३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी जायकांतर्गत २३० कोटींचा निधी मिळेलफ, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही अर्थसंकल्पाचे स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात येणार, याची खात्री देणारा हा अर्थसंकल्प आहे, असे शिंदे म्हणाले. तर देशाला आर्थिक महासत्ता बनवण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे, असे अजित पवार यांनी सांगितले. विविध वस्तू-सेवांवरील सात प्रकारचे शुल्क हटवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देशात तयार होणारे कपडे, चामड्याच्या वस्तू, मत्स्योत्पादनांवरील शुल्क कमी झाल्याने महाराष्ट्राला फायदा होईल, असा विश्वासही अजित पवार यांनी व्यक्त केला.मुंबई मेट्रो : १२५५.०६ कोटी, एमयूटीपी : ५११.४८ कोटी एमएमआर एकात्मिक-हरित प्रवासी सुविधा : ७९२.३५ कोटी मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे: ४००४.३१ कोटी इकॉनॉमिक क्लस्टर: १०९४.५८ कोटी महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क: ५९६.५७ कोटी.

# मनोज जरांगे पाटील यांनी केली धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार टीका





**छत्रपती संभाजीनगर :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर सातत्याने आरोप होताना दिसत आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. याच सर्वपार्श्वभूमीवर धनंजय मुंडे हे भगवान गडावर पोहोचले होते. नामदेव शास्त्री यांनी स्पष्ट केले की, मुद्दाम धनंजय मुंडे यांना टार्गेट केले जात आहे. भगवानगड धनंजय मुंडे यांच्या पाठीशी भक्कम उभा आहे. धनंजय मुंडे खंडणीवर जगणारे नेते नाहीत. धनंजय मुंडे यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाहीये. आता यावर बोलताना मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे दिसले. नामदेव शास्त्री यांच्याबद्दल बोलताना मनोज जरांगे हे म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या सर्व मारेकऱ्याना शिक्षा व्हायला हवी. नामदेव शास्त्री हे मोठे महंत आहेत. राजकीय लोक डागाळलेले असतात. मात्र, मला वाटत नाही ते बोलले असतील. त्यांना दोष देऊन जमणार नाही. जाणारे त्यांना शिकवत असतील की असे बोला तसे बोला. त्यांना दोष देण्यापेक्षा जो गेला ,तो जे करतो तो काही ऐकायला तयार नाही.विकृतपणाने केलेले कार्य याला समाज पाठीशी घालत नाही. टोळी सोडली तर समाजात प्रचंड उद्रेकाची लाट तयार झाली तर समाज पाठीशी घालणार नाही. गुंड थोडेच संप्रदाय चालवतात? गुंडाचे सहारे घेऊन संप्रदाय चालवतील अस वाटत नाही. हे शिकवले असा संशय येतो. ते माणूसच वेगळा आहेत. बोलण्याच्या ओघात ते बोलून गेले असतील तर दुरुस्त करतील. फास लागायला लागला तर असे होऊ शकते, फाशीची वेळ आली म्हणत जरांगे यांनी धनंजय मुंडेंवर टीका केली.पुढे जरांगे म्हणाले की, देशमुख यांची घटना मोठी त्याला गड पाठीशी घालू शकत नाही. गफलत असेल राज्याचे मोठे दुर्दैव आहे. शेवटी महंत महंत आहेत. बाबाजी कडू शब्द गेले असतील राज्याची मोठी हाणी आहे. खून केल्याचा आनंद आहे का? खून केलेल्यांना सोडुन द्या असा अर्थ होतो का?. काय शिकावे शिकवणाऱ्याने, बाबाजीला दोष देऊन काय उपयोग? तुम्ही माणूस मारून टाकला, माणसाच्या रक्ताची दया मया नाही का?संतोष देशमुख यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे आहे. पूर्वीचे दुःख देणारे हेच का? हीच का ती टोळी का?. धनंजय मुंडे कोणता सलोखा ठेवत आहेत? बाबाजी यांचा दोष नाही. न्यायाची अपेक्षा न करणे फक्त गुंड सांभाळणे. त्यांची सर या गुंडाला नाही येणार, बलात्कार, खून असे करून स्वत: च्या जातीच्या लोकांचे खून केले, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

# सुपर वुमन ! तीन एकर शेतात खजूर, ड्रॅगन फ्रुट आणि सफरचंदाची लागवड



**बीड :** शेती व्यवसाय करण्यास सध्याची तरुण पिढी नकार देत आहे. अस्मानी संकट, शेती मालाला योग्य बाजारभाव न मिळणे आणि भांडवलासाठी लागणारा पैसा यामुळे शेती करण्यास तरुण इच्छूक नाहीत असं म्हटलं जातं. तर काही लोक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये विविध प्रकारचे प्रयोग करत आहेत. परंतु बीडच्या एक महिला शेतकरी खजूर, ड्रॅगन फ्रुट आणि सफरचंदची शेती करून लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहे. विशेष म्हणजे बीड हा दुष्काळी जिल्हा असून देखील त्यांनी अतिशय रित्या शेतीचे नियोजन केलं आहे. चला तर मग जाणून घेऊ त्यांची यशोगाथा...

**तीन एकर क्षेत्रात विविध पिकांची लागवड :** विजया गंगाधर घुले असं महिला शेतकऱ्याचे नाव असून त्या बीड जिल्ह्यातील आष्टी येथील रहिवाशी आहेत. विजया घुले यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत योग्य मिश्र शेती करण्याचा निर्णय घेतला. २०१६ मध्ये सुरवातीला विजया घुले यांनी अर्धा एकर ड्रॅगन फ्रूटची लागवड करण्याचा निर्णय घेतला होता. नंतर कालांतराने खजूर आणि सफरचंदाची लागवड करण्याचा निर्णय घेतला. विजया यांनी खजूरची ८० झाडे तर सफरचंदचे २४० झाडे लावलेले आहेत. म्हणजे एकूण तीन एकर क्षेत्र हे मिश्र पिकासाठी गुंतवले आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे या तिनही पिकांमधून त्यांना भरघोस उत्पन्न मिळत आहे.खजुरातून मिळाले अडीच लाखांचे उत्पन्न सध्या खजूर पिकाचे उत्पादन सुरू झाले असून त्यातून चांगला आर्थिक फायदा होत असल्याचं विजया यांनी सांगितले आहे. प्रत्येक झाडापासून पहिल्याच वर्षी ७० किलो ते १२० किलोपर्यंत फळे मिळाली असून तो बाजारपेठेत ७० ते १०० रुपये दराने विक्री केला. तर किरकोळ बाजारांमध्ये १६० ते २०० रुपयांपर्यंत खजूरची विक्री केली. खजूराच्या ८० झाडापासून पहिल्याच वर्षे अडीच ते तीन लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तर पुढील वर्षी प्रती झाड दीडशे ते पावणे दोनशे किलो पर्यंत खजूर मिळणे अपेक्षित आहे.

# वयाच्या ५० नंतरही दिसाल २५ वर्षांचे तरुण, घरातील हे १० पदार्थ खूप औषधी, चेहरा ठेवतात काचेसारखा नितळ व पारदर्शक








सौंदर्य खुलवण्यासाठी अनेकजण केमिकलयुक्त उत्पादने वापरतात, मात्र त्यामुळे त्वचेस दीर्घकालीन हानी होण्याचा धोका असतो. नैसर्गिक उपायांमध्ये आयुर्वेदीक औषधी वनस्पतींचे स्थान महत्त्वाचे आहे. यामध्ये त्वचेला आतून पोषण देणारे घटक असतात, जे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणतात आणि त्वचेच्या आरोग्यास मदत करतात. हळद, कडुलिंब, चंदन, मुळेठी, केशर, आले, एलोवेरा, मनुका आणि तुळशी या औषधी त्वचेसाठी विशेष फायदेशीर ठरतात. यांचा नियमित वापर केल्यास मुरुम, काळे डाग, तेलकटपणा आणि सुरकुत्या यांसारख्या समस्या दूर होतात. बाजारातील सौंदर्यप्रसाधनांवर अवलंबून राहण्यापेक्षा या औषधींचा उपयोग करून तुम्ही चेहऱ्याच्या आरोग्यास नैसर्गिकरीत्या वृद्धी देऊ शकता. चला तर मग, काही औषधींच्या गुणधर्मांबद्दल जाणून घेऊया आणि त्यांचा आपल्या स्कीन रुटीनमध्ये कसा वापर करावा हे पाहूया.

### हळद

हळद ही एक प्रभावी औषधी वनस्पती असून त्वचेसाठी अत्यंत लाभदायक आहे. यात अँटीबॅक्टेरियल आणि अँटीइन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे मुरुम आणि त्वचेवरील संसर्ग कमी करतात. हळदीच्या नियमित वापरामुळे त्वचेचा रंग उजळतो, टॅनिंग दूर होते आणि चेहऱ्याला नैसर्गिक चमक मिळते. हळद दूध किंवा मधाबरोबर वापरल्यास त्वचेसाठी उत्तम मॉइश्चरायझर म्हणून कार्य करते.

### कडुलिंब

कडुलिंबाच्या पानांमध्ये नैसर्गिक अँटीबायोटिक आणि अँटीसेप्टिक गुणधर्म असतात, जे त्वचेवरील जंतुसंसर्ग रोखतात. याच्या नियमित वापरामुळे चेहऱ्यावर मुरुम कमी होतात आणि त्वचेला नैसर्गिक तजेला मिळतो. कडुलिंबाच्या पानांचा रस किंवा त्याची पेस्ट त्वचेवरील तेलकटपणा कमी करून त्वचेला स्वच्छ आणि चमकदार बनवते.

### चंदन

चंदनामध्ये थंडावा देणारे आणि त्वचेला गुळगुळीत करणारे गुणधर्म असतात. त्याचा लेप चेहऱ्यावर लावल्यास टॅनिंग दूर होते आणि त्वचेचा निखार वाढतो. चंदन पावडर आणि गुलाबजल यांचे मिश्रण त्वचेवरील अतिरिक्त तेल नियंत्रित ठेवते आणि त्वचेला स्वच्छ बनवते. कोरड्या आणि संवेदनशील त्वचेसाठी चंदनाचा वापर फायदेशीर ठरतो.

### मुळेठी

मुळेठी नैसर्गिक ब्लीच म्हणून ओळखली जाते. ती त्वचेत रंगनिर्मिती करणारे मेलानिन संतुलित ठेवते आणि त्वचा उजळ करण्यास मदत करते. मुळेठीचा रस त्वचेसाठी अँटी-एजिंग उपाय म्हणूनही कार्य करतो. सुरकुत्या आणि त्वचेवरील काळे डाग कमी करण्यासाठी मुळेठीचा लेप फायदेशीर ठरतो.

### केशर

केशर हे चेहऱ्याला नैसर्गिक चमक आणि नितळपणा देण्यासाठी उपयुक्त आहे. केशराचे दूध किंवा मधाबरोबर सेवन केल्यास त्वचेस नैसर्गिक उजळपणा मिळतो. याचा फेसपॅक तयार करून लावल्यास मुरुमांचे डाग कमी होतात आणि त्वचेतील रक्ताभिसरण सुधारते. कोरड्या त्वचेसाठी केशर एक उत्तम मॉइश्चरायझर आहे.

### आले

आले अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असून त्वचेतील अशुद्धता कमी करण्यास मदत करते. आल्याचा रस आणि मध यांचे मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास त्वचा स्वच्छ होते आणि ब्लॅकहेड्स दूर होतात. सूर्यप्रकाशामुळे त्वचेला नुकसान झाल्यास आले त्वचेसाठी नैसर्गिक थंडावा देण्याचे कार्य करते.

### एलोवेरा

एलोवेरा ही त्वचेसाठी सर्वोत्तम औषधी वनस्पती मानली जाते. यात अँटीबॅक्टेरियल आणि हायड्रेटिंग गुणधर्म असतात. एलोवेराचा नियमित वापर त्वचेला मॉइश्चरायझ करतो आणि मुरुम कमी करतो. उन्हामुळे झालेला सनबर्न आणि त्वचावरील कोरडेपणा दूर करण्यासाठी एलोवेरा अत्यंत उपयुक्त आहे.

# सही करताना स्वत:च नाव चुकीचं लिहून आलेला चिन्मय मांडलेकर, बायकोने सांगितले विसराळूपणाचे भन्नाट किस्से



**मुंबई-** मराठी टेलिव्हिजन तसेच सिनेसृष्टी मधला सर्वगुणसंपन्न अभिनेता म्हणून चिन्मय मांडलेकर चे नाव घेतले तर वावगे ठरणार नाही. आताच्या काळात पाहायला गेल्यास चिन्मय मांडलेकर हा नाट्यसृष्टी, सिनेसृष्टी आणि टेलिव्हिजन यांसारख्या तिन्ही माध्यमांवर कार्यरत आहे. तो उत्तम अभिनेता आहेच पण शिवाय तो उत्तम लेखक निर्माता आणि दिग्दर्शक सुद्धा आहे. त्यांनी साकारलेल्या अनेक कलाकृती प्रेक्षकांनी डोक्यावर घेतल्या. त्याच्या कामाची बरीच प्रशंसा झाली. आज अभिनेता चिन्मय मांडलेकर त्याचा ४६ वा वाढदिवस साजरा करत आहे. चिन्मय तिन्ही क्षेत्रांमध्ये कार्यरत असल्यामुळे त्याचे वेळापत्रक हे फारच व्यस्त असते. या सर्व कामाच्या गडबडीत बरेचदा त्याचा विसरभोळेपणा डोकं वर काढतो. याबद्दलचे मजेशीर किस्से त्याची पत्नी नेहा मांडलेकर हिने एका मुलाखतीत सांगितले होते. ती म्हणालेली की चिन्मय हा फार विसराळू आहे. तो विमानाची तिकिटं ४ /५ महिन्यांनतरची काढतो आणि विसरून जातो. जेव्हा आपण एअरपोर्टवर उभा राहतो तेव्हा समजतं की आजची आमची फ्लाईटची तिकीटच नाही. तो आम्हाला सिनेमाला नेतो पण त्या सिनेमाची तिकीट आदल्या दिवसाची असतात त्यामुळे भर सिनेमा चालू असताना आम्हाला थिएटर बाहेर सुद्धा काढले गेले आहे.त्यानंतर नेहाने त्यांच्या मुलीच्या शाळेतला किस्सा सांगितला. ती म्हणाली की एकदा मला माझ्या मुलीच्या शाळेतून फोन आला. ते म्हणाले की सरांनी एक चेक टाकला आहे पण तो आम्ही घेऊ शकत नाही. नेहा म्हणाले की मला आश्चर्य वाटलं मी का असं विचारल्यावर ते म्हणाले की सरांनी चेकवर मराठीत सही केली आहे आणि ते च वर वेलांटी द्यायलाच विसरले. म्हणजेच तो स्वतःचा नावंच चुकीचं लिहून आला. नेहा आणि चिन्मयच्या ओळखीबद्दल बोलायचे झाल्यास त्यांची ऑनलाइन ओळख झालेली. नेहाने एका डॉक्युमेंटरीचं स्क्रिप्ट चिन्मयला पाठवली होती. तिथून त्यांची ओळख झाली. ओळखीचं पुढे प्रेमात रुपांतर झालं आणि मग दोघांनी लग्न केलं.

# पोटच्या लेकीनेच बापाला फसवलं




**नागपूर:** आयुर्वेदिक औषधांच्या व्यवसायासाठी पाच कोटी रुपयांचे कर्ज मिळवून देण्याच्या बहाण्याने पोटच्या मुलीने साथीदारांच्या मदतीने वडिलांना ५० लाखांनी गंडा घातला. याप्रकरणी पोलिसांनी दोन महिलांसह पाच जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. मीना गाडेकर (रा. खामगाव रोड, बाळापूर, जि.अकोला), अभय पाटील (तिरंगा चौक, इस्मालपूर, जि. सांगली), मनीषभाई पुरुषोत्तमभाई उमेरठिया (रा. सुरत, गुजरात) समाधान विठ्ठलराव कसबे, प्रतिभा कसबे अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. महादेव भीमाजी दुधे (वय ८०, रा. शाहाकार लेआउट, वानाडोंगरी) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. मीना ही महादेव दुधे यांची मुलगी आहे. दुधे हे एमएसईबीमध्ये विभागीय लेखापाल होते. मे २०२२मध्ये मीना ही आपल्या माहेरी म्हणजेच दुधे यांच्या घरी आली.ङ्मी सुरतमधील साई फायनान्स कंपनीत काम करते. कंपनीत रक्कम गुंतविल्यास अधिक नफा मिळेल. कंपनीत ५० लाख रुपये गुंतविल्यास ५ कोटी रुपये मिळतील, असे आमिष तिने वडिलांना दाखविले. दुधे यांच्या मुलाला आयुर्वेदिक औषधांचा व्यवसाय करायचा असल्याने त्यांना पैशाची गरज होती. मुलीनेच सांगितल्याने त्यांचा विश्वास बसला. त्यानंतर मीना व अन्य चौघांनी दुधे यांची भेट घेतली, त्यांचा विश्वास संपादन केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्यात अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाची जिल्हा कार्यकारिणी गठीत...

**जनसंचलन/देऊळघाट**
**प्रतिनिधी-इमरान खान**

दिनांक १ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी इकरा फंक्शन हॉल देऊळघाट इथे अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाची जिल्हा कार्यकारिणी गठीत करण्यासाठी मीटिंग आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष व सरचिटणीस माननीय श्री साजिद निसार अहमद होते. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून वाशिम जिल्ह्याचे अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष श्री हसीन देशमुख उपस्थित होते. अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाच्या कार्यकारणी मध्ये जि .प उर्दू उच्च प्राथमिक शाळा मुले देऊळघाट चे सहाय्यक शिक्षक श्री शेख मतीन शेख नजीर सरांना जिल्हा अध्यक्ष पदाचा नियुक्ती पत्र कार्यक्रमाचे अध्यक्षाचे हस्ते प्रदान करण्यात आला . तसेच सचिव म्हणून उमर फारुख खान फयाज खान सहाय्यक शिक्षक धाड पंचायत समिती बुलढाणा , उपाध्यक्षपदी यावर खान सत्तार खान पंचायत समिती संग्रामपूर , व मोहम्मद इजहारूलहक आगा मेहमूदुलहक , सहसचिव पदी अब्दुल वाजिद मोहम्मद शफी , कार्याध्यक्ष पदी शेख इकबाल शेख जमाल पंचायत समिती खामगाव , कोषाध्यक्षपदी नासिर खान लतीफ खान पंचायत समिती बुलढाणा, जिल्हा नेते म्हणून अब्दुल रहीम अब्दुल रज्जाक शेख पंचायत समिती संग्रामपूर ,सल्लागारपदी आयाज मलिक खान फिरोज खान पंचायत समिती नांदुरा व बिलाल अहमद गुलाम रब्बानी पंचायत समिती मोताळा , प्रसिद्धी प्रमुख पदी अकमाम हुसेन इकराम हुसेन पंचायत समिती शेगाव, संघटक म्हणून सलमान जब्बार सुरतने पंचायत समिती जळगाव जामोद , मोहम्मद सालीक मोहम्मद आरिफ पंचायत समिती नांदुरा, व हारीस गफ्फार सुरतने पंचायत समिती संग्रामपूर , जिल्हा सदस्य म्हणून जुबेरोद्दीन मोईनोद्दीन पंचायत समिती बुलढाणा, फिरोज खान मनसब खान पंचायत समिती नांदुरा, , शेख नदीम शारिक अब्दुल करीम पंचायत समिती चिखली, तर जिल्हा सदस्य महिला प्रतिनिधी म्हणून श्रीमती शबीना अमीर हमझा पटेल पंचायत समिती खामगाव यांची नियुक्ती करण्यात आली व त्यांना नियुक्तीपत्र अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष व सरचिटणीस माननीय श्री साजिद निसार अहमद यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुराणचे वाचन करून करण्यात आले. शेख नईम



अब्दुल्ला सरांनी हम्द व जमील शाह मंजूर शाह सरांनी नाते पाक चे गायन केले. या प्रसंगी मुख्याध्यापक अब्दुल्ला खान बिस्मिल्ला खान , मुख्याध्यापक इस्माईल खान फयाज खान, मुख्याध्यापक शेख अबरार शेख मदार , इकरा एज्युकेशन ट्रस्ट चे संस्थापक शेख अहमद शेख सत्तार , रियाज अहमद सर, नईम मलिक सर, इल्यास सर , फिरोज खान सर, शेख परवेज सर , माजिद रजा सर व इतर शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हसीन देशमुख सरांनी कार्यक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले. सय्यद अंजुम सरांनी व रिजवान अहमद देशमुख सरांनी मनोगत व्यक्त केले , अध्यक्ष भाषण साजिद निसारांनी केले . आभार प्रदर्शन शेख मतीन सरांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आकिब रजा सरांनी केले.सर्व नवनियुक्त कार्यकरणीत सामील सदस्यांना उपस्थित शिक्षकांनी व मित्रांनी शुभेच्छा दिल्या.

# श्री व्यंकटेश महाविद्यालयात भारताचे संविधान ग्रंथ व उद्देशिका वितरण

## सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांचा स्तुत्य उपक्रम



**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयात सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारताचे संविधान ग्रंथ व उद्देशिका वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. मुख्याधिकारी तथा प्रशासक अरुण मोकळ यांच्या अध्यक्षतेखाली आमदार मनोज कायंदे, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, शिवसेना नेते छगनदादा मेहेत्रे, डॉ. रामप्रसाद शेळके, मोहम्मद सिद्दीकी, डॉ. भगवान खरात, ॲड. रवींद्र एडके, तहसिलदार वैशाली डोंगरजाळ, नायब तहसिलदार सायली जाधव, वनपरिक्षेत्र अधिकारी उमेश गायकवाड, पोलीस निरीक्षक संतोष महल्ले, ॲड. विजय सूनगत व इतर मान्यवरांच्या हस्ते विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानाची प्रत व उद्देशिका वितरीत करण्यात आले. भारतीय लोकशाही बळकट ठेवण्यासाठी भारताचे संविधान किती महत्वाचे आहे हे डॉ. खरात यांनी पटवून दिले. याप्रसंगी श्री व्यंकटेश महाविद्यालय,न प छत्रपती श्री शिवाजी महाराज हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, स्वामी विवेकानंद विद्यालय, देऊळगाव राजा कनिष्ठ महाविद्यालय, दीनदयाल विद्यालय, सहकार विद्या मंदीर, महात्मा फुले कृषी तंत्र विद्यालय यांच्यासह विविध शाळेतील विद्यार्थ्यांना संविधान व उद्देशिका वितरीत करण्यात आल्या. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अनेक महनीय व्यक्तींना भारताचे संविधान ग्रंथ, उद्देशिका व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक व उद्देशिका वाचन या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. मधुकर जाधव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदीप हिवाळे यांनी केले. अतिशय स्तुत्य उपक्रम आयोजित केल्याबद्दल चंद्रकांत खरात यांचा मान्यवरांच्या हस्ते कौटुंबिक सत्कार करण्यात आला.

# जिल्ह्यात ३५ महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील युवक युवतींना कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात ३५ महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह्यातील उमेदवारांनी या महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तसेच युवक युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून




देण्यासाठी राज्य शासनाने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे. प्रशिक्षण क्षेत्र : जीएसटी सहाय्यक, सॉफ्टवेअर डेव्हलपर, फिल्ड टेक्निशियन, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ईलेक्ट्रीशियन, सोलर पॅनल इन्स्टॉलेशन टेक्निशियन, जनरल ड्यूटी असिस्टंट, मोबाईल हार्डवेयर टेक्निशियन, हॅण्डसेट ॲण्ड टॅबलेट रिपेअर टेक्निशयन, डिझाइनर मेकॅनिकल इत्यादी पदांच्या कामाचे प्रशिक्षण महाविद्यालयनिहाय आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रात दिले जाणार आहे.

# बसमध्ये चढताना महिलेचे दागिने लंपास



**जनसंचलन/मोताळा**

एसटी बसमध्ये चढताना एका महिला प्रवाशाच्या पर्समधील साडेतीन ते पावणेचार तोळे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शनिवारी दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजता मोताळा बसस्थानकात घडली. बोराखेडी पोलिसांनी बसमधील प्रवाशांची झाडाझडती घेतली; मात्र दागिने दिसले नाहीत. जळगाव जामोद येथून निघालेली (एम. एच. १३ सी. यू. ७५२७) ही एसटी बस मोताळामार्गे बुलढाण्याकडे जात होती. दरम्यान, बोराखेडी येथील शिक्षक जाफर पटेल यांची पत्नी व मुलगी बुलढाणा येथे जाण्यासाठी मोताळा येथून या बसमध्ये चढल्या. त्या देऊळघाट येथे लग्न समारंभासाठी जात असल्याने त्यांनी सोन्याचे दागिने पर्समध्ये ठेवले होते. त्यामध्ये १५ ग्रॅमचा हार, १० ग्रॅमची पोथ, १० ग्रॅमचे कानातील दोन सेट, दोन ग्रॅमच्या इअररिंग आदी दागिन्यांचा समावेश होता. दरम्यान, बसमध्ये चढताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्सची चेन उघडली व त्यातील जवळपास साडेतीन ते पावणेचार तोळे सोन्याचे दागिने लंपास केले होते.

# बुलढाण्यात सहकाराचा जागरसहकार दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत

## दुचाकी-चारचाकी वाहनांची रॅली : टाळ, मृदंगांचा निनाद पारंपरिक फेटे, वेशभूषेने वेधले लक्ष



पतसंस्थांच्या महिला, पुरुष कर्मचाऱ्यांचा उत्साही सहभाग...

जनसंचलन/बुलढाणा

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त नागपूर येथून निघालेल्या सहकार दिंडीचे बुलढाणा येथे जोरदार स्वागत करण्यात आले. १ फेब्रुवारीला दुचाकी व चारचाकी वाहनांसह सहकार दिंडीच्या रथाची शहरातून मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी दिंडीचे उत्साही स्वागत करण्यात आले. या दिमाखदार दिंडी सोहळ्याचे संपूर्ण नियोजन बुलढाणा जिल्हा नागरी फेडरेशनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्यासह सहकारी पतसंस्था फेडरेशनचे राज्याध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी केले. सहकाराचा जागर करत सहकार समृद्ध करण्याचा संदेश या दिंडीतून देण्यात आला. नागपूर येथून सहकारी पतसंस्था फेडरेशनचे राज्याध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या नेतृत्वात २९ जानेवारीला सहकार दिंडी निघाली. वर्धा, अमरावती, यवतमाळमार्गाने ३१ जानेवारीला मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यात दिंडीचे आगमन झाले. मेहकरातील मिरवणुकीनंतर शुक्रवारी सायंकाळीच बुलढाणा शहरात सहकार दिंडी दाखल झाली. यावेळी बुलढाणा जिल्हा नागरी फेडरेशनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या हस्ते दिंडीचे स्वागत करण्यात आले. १ फेब्रुवारीला सकाळी नऊ वाजता साई लॉन्सवर आमदार संजय गायकवाड, राधेश्याम चांडक, काकासाहेब कोयटे, बुलढाणा अर्बन परिवाराचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांच्या हस्ते सहकार ध्वज फडकविण्यात




आला. यानंतर चिखली रोडने दिंडीचे शहरात आगमन झाले. सर्व पतसंस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी आपापल्या दुचाकी व चारचाकी वाहनांसह दिंडी मिरवणुकीत सामील झाले होते. विशेष म्हणजे सर्वांनी फेटे परिधान केल्याने दिंडी सोहळ्याने बुलढाणेकरांचे लक्ष वेधले. कोमलताई झंवर, जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक खरात, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, सुदर्शन भालेराव, संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्यासह जिल्हाभरातील पतसंस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने या दिंडीत सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेऊन पतसंस्थांच्या महिला कर्मचाऱ्यांनी दिंडीची शान वाढविली. सहकार दिंडीमधील मान्यवरांचे ठिकठिकाणी महिला कर्मचाऱ्यांनी औक्षण केले. सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण तसेच जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेचे सीईओ डॉ. अशोक खरात यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेसमोरच विशाल आणि आकर्षक रांगोळी काढून स्वागत करण्यात आले. सहकार दिंडीच्या स्वागतासाठी सर्वच पतसंस्थांच्या वतीने शहरात सर्वत्र शंभरावर स्वागत कमानी उभारल्या होत्या. या कमानी लक्षवेधी ठरल्या. एकंदरीत सहकार दिंडीने शहरवासी भारावून गेले.




राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनतर्फे ९ फेब्रुवारीला शिर्डी येथे राज्यातील सर्व पतसंस्थांची सहकार परिषद होत आहे. या परिषदेप्रसंगी सहकार दिंडीचा समारोप होणार आहे. विदर्भातील अकरा जिल्ह्यांमधून सर्व पतसंस्थांची ही सहकार दिंडी निघाली आहे. बुलढाण्यातील दिंडी सोहळा आटोपून ही दिंडी चिखली, देऊळगाव राजा, जालना, छत्रपती संभाजीनगरमार्गे शिर्डीकडे मार्गस्थ झाली आहे. मिरवणुकीदरम्यान शहरभर मान्यवरांनी सहकार पालखी खांद्यावर घेतली. संगम चौकात या दिंडी मिरवणुकीचा समारोप झाला. या ठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. ही पालखी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विशाल स्मारकाजवळ नेण्यात आली. त्या ठिकाणी पूजन व हारार्पण करून शिवरायांना मानवंदना देण्यात आली.

# घरातून सव्वाचार लाखांचा ऐवज पळविला !

जनसंचलन/ खामगाव

शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, सावजी ले-आऊट भागातील एका घरात चोरीची घटना घडली आहे. ३१ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून ४ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सावजी ले-आऊटमधील पवन बाळकृष्ण अहीर हे कुटुंबासह वाशिम येथे त्यांच्या मावस जावयाच्या निधनानंतर गेले होते. यावेळी घर बंद असल्याचे हेरून अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप



तोडून आत प्रवेश केला. कपाटातील सोन्याचे दागिने व रोकड असा एकूण ४.१४ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी पवन बाळकृष्ण अहीर यांनी शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४), ३०५ (ए) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. गेल्या दोन दिवसांत शहरात तीन घरफोडीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे.

# नाफेड अंतर्गत सुरू असलेल्या शासकीय खरेदी केंद्रांना मुदत वाढ द्या अन्यथा शेतकऱ्यांचे हितासाठी शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल - जालिंदर बुधवत

जनसंचलन/बुलढाणा

काही दिवसापूर्वी नाफेड अंतर्गत सुरू करण्यात आलेली शासकीय खरेदी केंद्र बारदाण्या अभावी बंद पडले होते. आता या शासकीय खरेदी केंद्राची मुदत संपत आलेली आहे. शेतकऱ्यांच्या घरातील सोयाबीनचा शेवटचा दाणा खरेदी होईपर्यंत ही खरेदी केंद्र सुरू ठेवण्यात यावी यासाठी आज दिनांक ३१/१/२५ रोजी मा जिल्हाधिकारी बुलढाणा यांना जालिंदर बुधवत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख बुलडाणा यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले.!

यावेळी जालींधर बुधवत पुढे म्हणाले कि मायबाप शेतकऱ्यांच्या घरात सोयाबीन पडून आहे. योग्य भाव मिळत नसल्याने आर्थिक संकट उभे ठाकले आहे. त्यात बारदाना अभावी सोयाबीन खरेदी न करण्यासाठी टाळाटाळ करण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली होती. सोयाबीन हया शेतमालाला मार्केट मध्ये योग्य भाव नसल्यामुळे नाफेड अंतर्गत शासकीय खरेदी सुरु करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या घरात अजुन फार मोठ्या प्रमाणात सोयाबीन असुन सदरील खरेदी ही संथगतीने सुरु आहे. शेतमाल केंद्रावर बोलल्यानंतर सदरील



शेतमालामध्ये मॉईश्चर, काडी कचरा, फुटतुट, डागी प्रमाण अशी कारणे देऊन शेतकऱ्यांचा माल सोयाबीन खरेदी करण्यास टाळाटाळ करण्यात येते. त्यातच ३१ जानेवारीपर्यंत या खरेदी केंद्रांना मुदत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या घरातील सोयाबीनचा शेवटचा दाणा खरेदी होईपर्यंत ही खरेदी केंद्र सुरू ठेवण्यात यावीत, त्यांना मुदतवाढ देण्यात यावी अशी आमची मागणी आहे. संपूर्ण शेतकऱ्यांची घरात असलेली सोयाबीन मोजणी होईपर्यंत खरेदी केंद्रे बंद करू नये अन्यथा शेतकऱ्यांचे हितासाठी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958